**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रस्तावावर चर्चेला आज प्रधानमंत्री लोकसभेत उत्तर देणार

- कृषीविषयक योजनांमधे कोणतीही अनियमितता सहन केली जाणार नाही असं केंद्रीय कृषीमंत्र्यांचं स्पष्ट प्रतिपादन

- भाडेपट्ट्यानं तसंच कब्जे हक्कानं दिलेल्या जमिनींचं रुपांतरण करताना कमी अधिमूल्य आकारण्याच्या अभय योजनेला मुदतवाढ

- मुंबई महानगरपालिकेचं आगामी आर्थिक वर्षासाठीचं शिलकी अंदाजपत्रक सादर

**आणि**

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडास्पर्धांच्या पदकतालिकेत महाराष्ट्राला एकूण ६१ पदकांची कमाई

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रस्तावावर चर्चेला उत्तर देतील अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी दिली. संध्याकाळी पाच वाजता मोदी चर्चेला उत्तर देणार आहेत. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रस्तावावरल्या चर्चेला काल संसदेच्या दोन्ही सभागृहात सुरूवात झाली.

प्रचंड संसाधनं आणि क्षमता असतानाही सध्याच्या राजवटीत उत्पादन क्षमतेचा योग्य वापर होत नाही, अशी टीका समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी चर्चेदरम्यान केली. केंद्र सरकार लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरलं आहे, असं सांगत महाकुंभ मेळ्यात उत्तर प्रदेश राज्य सरकारला गर्दीचं व्यवस्थापन करता आलं नाही, असा आरोपही त्यांनी केला. उत्पादनाच्या बाबतीत भारत इतर देशांपेक्षा पिछाडीवर पडला असून ही कमतरता दूर करण्यासाठी कठोर पावलं उचलणं गरजेचं असल्याचं तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी म्हणाले.

तर भाजपा खासदार संजय जैस्वाल यांनी सरकारच्या कामगिरीवर प्रकाश टाकला.

**<><><><><>**

कृषीविषयक योजनांमधे कोणतीही अनियमितता सहन केली जाणार नाही, तसंच प्रधानमंत्री पिक विमा योजनेत जर भ्रष्टाचार झाला असेल तर त्याची चौकशी केली जाईल, आणि दोषींवर कारवाई केली जाईल, असं आश्वासन कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज लोकसभेत दिलं. महाराष्ट्रात पिकविमा योजनेत गेल्या सरकारच्या काळात भ्रष्टाचार झाल्याचं वक्तव्य राज्याचे कृषी मंत्री शिवाजीराव कोकाटे आणि भाजपा आमदार सुरेश धस यांनी केल्याचं खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत सांगितलं. याबाबत सुळे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना चौहान बोलत होते.

**होल्ड - बाईट - चौहान......**

महाराष्ट्र सरकारनं पिकविमा योजनेच्या सुधारणेसाठी पावलं उचलली आहेत, असंही चौहान म्हणाले.

देशातल्या शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. सरकारनं २०१९ पासून उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा गृहित धरून किमान हमीभाव ठरवले आहेत, असं चौहान म्हणाले. नारळ उत्पादनात भारत  जगात पहिल्या क्रमांकाचा देश बनल्याचा उल्लेखही यावेळी चौहान यांनी केला.

<><><><><>

२०३१-३२ पर्यंत ऊर्जा निर्मितीची क्षमता ८७४ गिगावॅटपर्यंत वाढवण्याची सरकारची योजना असल्याचं केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी राज्यसभेत  एका लिखित प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. यात कोळसा, लिग्नाईट यासारख्या पारंपरिक तसंच सौर, पवन आणि जल ऊर्जेसारख्या नवीकरणीय ऊर्जास्रोतांचा समावेश असेल असं नाईक म्हणाले.

**दरम्यान**, कुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी चर्चा घडवून आणण्याची विरोधी पक्षाची मागणी राज्यसभेचे उपाध्यक्ष हरीवंश यांनी फेटाळून लावली.

**भविष्यात** कुठल्याही साथीच्या रोगाचा सामना करण्यासाठी देशातली आरोग्य यंत्रणा सज्ज आहे, असं केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी सांगितलं. राज्यसभेत पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

<><><><><>

दिल्ली विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान निवडणूक आयोगाची जाणूनबूजून बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचं  निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी  मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार

यांच्यावर वारंवार केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर हे विधान महत्वाचं ठरत आहे. निवडणूक आयोग या आरोपांची दखल न घेता आपलं काम कायद्याच्या चौकटीत राहून अतिशय निःपक्षपातीपणे करतच राहील असं आयोगाने समाजमाध्यमांवर म्हटलं आहे.

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी उद्या मतदान होणार आहे. यासाठीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. एक कोटी ५६ लाखाहून अधिक मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या निवडणुकीत एकूण ६९९ उमेदवार रिंगणात आहेत. शनिवारी आठ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

भाडेपट्ट्यानं तसंच कब्जे हक्कानं दिलेल्या जमिनींचं रुपांतरण करताना कमी अधिमूल्य आकरण्याच्या अभय योजनेला राज्य मंत्रीमंडळानं आज मुदत वाढ दिली. शेती, अकृषिक, निवासी, वाणिज्यिक अथवा औद्योगिक प्रयोजनासाठी तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिलेल्या जमिनींच्या बाबत हा निर्णय लागू होईल. शासकीय भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनी भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरीत करताना कमी अधिमूल्य आकारण्यासाठी ही सवलत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आज ही बैठक झाली.

सातारा जिल्ह्यात कोयना जलाशयामध्ये बुडीत बंधारे बांधण्याच्या २५ प्रकल्पांसाठी १७० कोटी रूपयांच्या तरतूदींना विशेष बाब म्हणून मंत्रीमंडळानं प्रशासकीय मान्यता दिली. याशिवाय पुणे जिल्ह्यातल्या टेमघर प्रकल्पाच्या गळती प्रतिबंधक उपाययोजनेची उर्वरित कामे आणि धरण मजबुतीकरणाच्या कामांसाठी ३१५ कोटी ५ लाख रूपयांच्या खर्चालाही या बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली.

<><><><><>

मुंबई महानगरपालिकेचं २०२५-२६ या वर्षासाठी ७४ हजार ४२७ कोटी रुपयांचं आणि ६० कोटी ६५ लाख रुपये शिलकीचं अंदाजपत्रक आज सादर झालं. मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी पालिका मुख्यालयात महापालिका आयुक्त, तसंच राज्य नियुक्त प्रशासक भूषण गगराणी, यांच्यापुढे ते सादर केलं. यंदाचा अर्थसंकल्प गेल्या वर्षीच्या तुलनेत १४ हजार ४७२ कोटी ६६ लाख रुपयांनी वाढला आहे, तर शिल्लक रकमेत २ कोटी ४३ लाख रुपये वाढ झाली आहे. कोस्टल रोड, गोरेगाव मुलुंड लिंक रोड, वर्सोवा - दहिसर लिंक रोड ते मीरा भाईंदर पर्यंतचा उन्नत मार्ग या महत्त्वाकांक्षी नागरी वाहतूक प्रकल्पांचा या अर्थसंकल्पात समावेश आहे. मलनिःसारण प्रकल्पासाठी साडेपाच हजार 5 कोटी, पाणीपुरवठा प्रकल्पासाठी चार हजार कोटी, पर्जन्य जलवाहिन्यांसाठी पाचहजार कोटी, अशी भरघोस तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

<><><><><>

अमेरिकेचे महावाणिज्यदूत माईक हँकी यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. महाराष्ट्रात उद्योग उभारण्यासाठी अनेक अमेरिकन कंपन्या उत्सुक असल्याचे हँकी यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितलं.राज्यात ऊर्जा, नव तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, नवनवीन क्षेत्रामधील सहयोगाबद्दल तसंच ऊर्जा क्षेत्रात संधी, विकास आणि पायाभूत सुविधा उभारणीत नवतंत्रज्ञानाचा वापरावर दोघांमध्ये चर्चा झाली.

<><><><><>

आज जागतिक कर्करोग विरोधी दिन आहे. युनायटेड बाय युनिक अशी या दिनाची संकलंपना असून  कर्करोगाला प्रतिबंध, त्याचं निदान आणि उपचार याबाबत जनजागृती करण्यासाठी हा दिवस पाळला जातो.

जागतिक कर्करोग दिनानिमित्त नागपूर इथल्या राष्ट्रसंत तुकडोजी कर्करोग रुग्णालय आणि संशोधन केंद्राच्यावतीनं आज जनजागृती फेरी काढण्यात आली. यावेळी विविध घोषवाक्य तसंच पथनाट्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक ६१ पदकांची कमाई केली आहे. त्यात १५ सुवर्ण, २६ रौप्य आणि २० कास्यपदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत महाराष्ट्राचं तिसरं स्थान कायम असून पहिल्या स्थानावर कर्नाटक तर दुसऱ्या स्थानावर सेना दलांचा समावेश आहे. तसंच, मणिपूर, मध्य प्रदेश, तामिळनाडू, दिल्ली, हरयाणा आणि पंजाब यांचा पहिल्या दहा संघांत समावेश आहे.

**<><><><><>**

राज्यात GBS या आजाराच्या प्रादुर्भावाविषयी केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी काल दूरस्थ माध्यमातून आढावा बैठक घेतली. संशयित रुग्णांची संख्या वाढत असली तरी हा आजार संसर्गजन्य नाही, त्यामुळे परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचं त्यांनी सांगितलं. या आजाराच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी केंद्रसरकारशी समन्वय राखून काम करावं असं ते म्हणाले. केंद्रसरकार या संदर्भात हरप्रकारे मदत करील असं आश्वासन त्यांनी दिलं.  केंद्रीय

आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळच्या संत राऊळ महाराज महाविद्यालयात आज 'डिस्ट्रिक्ट इन्स्पायर कॅम्प'ला सुरुवात झाली. केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या वतीने घेतलेल्या या ५ दिवसांच्या निवासी शिबीराचं उदघाटन सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी अनिल पाटील यांच्या हस्ते वडाच्या रोपट्याला जलदान करून झालं.

**//<><><><><>//**